**प्रेसनोट दि.२१/०३/२०१९**

**अल्पवयीन मुलीचे विनयभंगाचे येरवडा पोलीस स्टेशन, पुणे कडील दाखल गुन्ह्यातील आरोपीस एक वर्ष सक्त मजूरीची शिक्षा झाले बाबत.**

---

आरोपी १)राजेश राधेय रावणे,वय ३२ वर्षे,रा.५२/३/४,मारूतीनगर,कल्याणी निवास, वडगांवशेरी, पुणे २)सुजित पिखारी सिंग,वय २४ वर्षे,रा.अशोक शिंदे चाळ,वडगांव-शेरी,पुणे यांनी दि.२०/०१/२०१५ रोजी दु.१२:३० वा.चे वेळेस मोटार सायकलवरून येऊन, नवरत्न सोसायटी, जवळ,वडगांवशेरी,पुणे येथून रस्त्याने पायी जाणारे एका १४ वर्षे वयाचे मुलीचे गालास हात लावून, अंगाला स्पर्श करून, डोक्यावरून हात फिरवून, अंगाला चिकटून तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केलेने सदर मुलीचे आईने दिलेल्या फिर्यादीवरून वरील आरोपींचे विरूध्द येरवडा पो. स्टे. येथे दि.२२/०१/२०१५ रोजी गुन्हा रजि.नं.२८/२०१५ भा.दं.वि.क. ३५४(अ),५०६,३४ लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधि.कलम ८ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आलेला होता. सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन पो.उप.नि.लोखंडे यांनी करून, तपासाअंती आरोपींविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. न्यायालयीन प्रक्रियेपुर्वी यातील आरोपी सुजित पिखारी सिंग,वय २४ वर्षे,रा.अशोक शिंदे चाळ,वडगांवशेरी,पुणे हा मयत झालेला आहे.

सदरची कामगिरी येरवडा पो.स्टे.कडील श्री.राजेंद्र कदम,वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तत्कालीन पो.उप.नि.लोखंडे, पैरवी अधिकारी,पो.उप.निरी.राजेंद्र कांबळे यांचे मार्गदर्शनाखाली कोर्ट कर्मचारी पो.हवा.५३२४, राजेश शेलार, पो.हवा.१०८ सुधीर चिकणे यांनी गुन्ह्यातील दोन्ही आरोपीचे दोषसिध्दीसाठी विशेष तपास केल्याने मा.न्यायालयाने यास १ वर्ष सक्त मजूरी व ३०००/- रू. दंड, दंड न भरल्यास ६ महिने कैद अशी शिक्षा दिलेली आहे.

**( राजेंद्र कदम )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
येरवडा पोलीस स्टेशन,पुणे